Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date: 08 December 2024

Time: 11.00 to 11.05 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक: ०८ डिसेंबर २०२४ सकाळी ११.०० वाजता.**

****

मणीपुरमध्ये सुरक्षा दलांनी भारत– म्यानमार दरम्यान असलेल्या सीमावर्ती भागातील कांगपोकपी जिल्ह्यात आज शोध मोहिम सुरू केली आहे. त्यामध्ये मोठ्या प्रमाणात शस्त्रसाठा सापडला असून, त्यात रायफल, पिस्तुल, हॅण्ड ग्रेनेड, डेटोनेटर अशा विविध प्रकारच्या शस्त्रसाठ्याचा समावेश आहे.

****

भारताचे संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आजपासून तीन दिवसांच्या रशीया दौऱ्यावर रवाना होणार आहेत. या दौऱ्यात त्यांची समपदस्थ आंद्रेई बेलौसोव यांच्यासोबत संरक्षणासंदर्भात बैठक होणार असून, त्यात संरक्षणविषयक विविध करार होणार आहेत.

****

राज्य विधिमंडळाच्या विशेष अधिवेशनाला कालपासून सुरुवात झाली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्यासह महायुतीच्या सदस्यांना सदस्यत्वाची शपथ देण्यात आली. काल शपथग्रहणावर बहिष्कार टाकलेल्या महाविकास आघाडीच्या आमदारांसह शपथ ग्रहण बाकी असलेल्या उर्वरित आमदारांचं शपथग्रहण आज प्रस्तावित आहे. दरम्यान, विधानसभा अध्यक्षांची निवड उद्या होणार असून, त्यासंदर्भातचा प्रस्ताव सादर करण्याची मुदत आज दुपारी बारा वाजेपर्यंत आहे.

****

देशाची राजधानी दिल्लीतील हवेची गुणवत्ता आज सकाळी अतिशय खराब होती. सकाळी ७ वाजता हवेचा गुणवत्ता निर्देशांक अर्थात एक्यूआय स्केल २६३ एवढा नोंदवला गेला. राजधानी दिल्लीतील वातावरण आगामी दोन दिवस सकाळ आणि संध्याकाळी दुषीतच राहण्याचा अंदाज दिल्लीच्या हवामान विभागानं वर्तवला आहे.

दरम्यान, राज्यात येत्या दोन दिवसात कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात हवामान कोरडं राहील तर विदर्भात तुरळक ठिकाणी पाऊस पडेल, असा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

****

सीमेवर सैन्यदलाच्या जवानांच्या जागत्या पहाऱ्यामुळे देशातले नागरिक सुखाने राहू शकतात आणि देश प्रगती करू शकतो. ही जाणीव ठेवून प्रत्येकानं सशस्त्र सैन्यदल ध्वजनिधीला आपलं योगदान दिलं पाहिजे, असं प्रतिपादन राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांनी केलं आहे.

सशस्त्र सेना ध्वज दिनाच्या ७५ व्या अर्थात अमृतमहोत्सवी वर्धापन दिनानिमित्त राज्यपाल राधाकृष्णन यांनी सशस्त्र सेना ध्वज निधी संकलन मोहिमेचा काल मुंबईत राजभवन इथं शुभारंभ केला, त्यावेळी ते बोलत होते.

सैनिक कल्याण विभागाचे संचालक –निवृत्त कर्नल  दीपक ठोंगे यांनी राज्यपालांच्या परिधानाला सैन्य दलाच्या ध्वजाची प्रतिकृती लावली आणि राज्यपालांनी ध्वजनिधीला आपलं योगदान यावेळी दिलं.

****

नंदुरबार जिल्ह्याच्या शहादा तालुक्यात  असलोद गावात आज दारुबंदीसाठी मतदानाची प्रक्रीया सुरु असल्याचं आमच्या वार्ताहरानं  कळवलं आहे.  दारुमुळे नागरीकांचं होणारं नुकसान लक्षात घेत स्थानिकांच्या पुढाकारातून राज्य उत्पादन शुल्क विभागाकडे दारु बंदीचा ठराव मांडण्यात आला  होता. त्यानुसार  नोटीस जारी करुन आज शहादाच्या  तहसिलदारांच्या निगराणीमध्ये सकाळी आठवाजे पासून सायंकाळी पाच वाजेपर्यंत गावातील तीन मतदान केंद्रावर हि मतदान प्रक्रीया सुर राहणार आहे. सायंकाळी पाच नंतर लगेच च मतमोजणीही देखील होणार आहे.

****

बीड जिल्ह्यात अंबाजोगाई इथं श्री योगेश्वरी देवीच्या मार्गशीर्ष नवरात्र महोत्सवाला आज प्रारंभ झाला. थोड्याच वेळापूर्वी  वर्णी देण्याचा कार्यक्रम पार पडला आहे.

****

ऑस्ट्रेलियाच्या ॲडलेड इथं सुरु असलेल्या बॉर्डर-गावस्कर चषक कसोटी क्रिकेट मालिकेच्या दुसऱ्या सामन्याचा आजचा चौथ्या दिवसाचा खेळ सुरु झाला आहे.

भारतानं आपल्या दुसऱ्या डावात काल दिवस अखेरच्या पाच बाद १२८ धावांवरुन पुढे खेळायला सुरुवात करत शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा भारताच्या सर्वबाद १७५ धावा झाल्या असून, ऑस्ट्रेलियाला जिंकण्यासाठी केवळ १९ धावांची गरज आहे.

****

संयुक्त अरब अमिरातीच्या,दुबई इथं आयोजित १९ वर्षाखालील पुरुषांच्या एकदिवसीय क्रिकेट समन्यांच्या आशिया चषक स्पर्धेत भारत-बांग्लादेश दरम्यान अंतिम सामना सध्या सुरु आहे. नाणेफेक जिंकून भारतानं क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतल आहे. बांग्लादेशनं ४ षटकांत बिनबाद १४ धावा केल्या आहेत.

****